# नियमित दिवाणी दावा क्र. ३२६/२०१४ मधील नि.क्र.३० वरील आदेश.

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ६, ८, १०, १२ ते १४ व २१ यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना कैफीयत हा आदेश रद्द होऊन, कैफीयत स्वीकारण्यात यावी यासाठी केलेला आहे.

२. प्रतिवादींनी कथन केले आहे की, ते सर्वजण शेतकरी अशिक्षित आहेत. तसेच सदर वादी प्रतिवादी दरम्यान अहमदनगर येथेही प्रकरण चालू आहे. त्यामुळे प्रतिवादींना जामखेड न्यायालयातील तारखेबाबतची माहिती झाली नाही. त्यामुळे सदर प्रतिवादींविरुध्द विना कैफीयत चा आदेश झालेला आहे. प्रतिवादींनी अर्जासोबत कैफीयत दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादींची कैफीयत न स्वीकारल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. शेवटी प्रतिवादींनी त्यांचेविरुध्द झालेला विना कैफीयत हा आदेश रद्द होवून, त्यांची कैफीयत स्वीकारण्यात यावी अशी विनंती केली.

३. वादींनी या अर्जावर म्हणणे देवून कथन केले की, प्रतिवादी दिनांक दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर दिनांक २३/०६/२०१५ रोजी हजर झालेले आहेत. तत्पुर्वी प्रतिवादींनी दुसरा दावा दाखल केलेला होता. त्यामुळे वाद मिळकतीची पुर्ण माहिती प्रतिवादींना होती. प्रतिवादींचा अर्ज संदिग्ध असून अर्जामधील कारण संयुक्तिक नाही. शेवटी वादींनी प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. वादींतर्फे श्री. आर.ई. काळे वकील व प्रतिवादींतर्फे श्री. ए. के. शेख वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

५. सदरचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द खरेदीखत रद्द करुन मिळणेसाठी, वाटप, कब्जा व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जासोबत कैफीयत दाखल केली आहे. ती अभिलेखावर दाखल करुन घेतल्यास दाव्यातील खरी वस्तुस्थिती समोर येवून न्यायनिर्णयास मदत होणार आहे आणि वेळेचा अपव्यय

टाळण्याच्या दृष्टीने देखील योग्य आहे. परंतु प्रतिवादींनी हजर झाल्यानंतर कैफीयत उशिराने दाखल केलेली आहे. सदर विलंबामुळे वादींचे झालेले आर्थिक नुकसान विचारात घेता, पुढीलप्रमाणे आदेश करणे न्यायोचित होईल. सबब आदेश,

**आ दे श**

१. अर्ज रक्कम रु.४००/- च्या खर्चाने मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम प्रतिवादींनी वादी यांना देणेची आहे.

(खुल्या न्यायालयात निवेदित व जाहीर)

सही/-
**(ए. एम. मुजावर)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांक : १४/१०/२०१६.